महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ १७ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक - ०८५ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत ०२ रुपये

## अदानींच्या सिमेंट प्रकल्पाविरोधात
# खासदार बाळ्यामामांचा एल्गार



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील कल्याण तालुक्यातील मोहने गावाजवळ अदानी ग्रुपतर्फे अम्बुजा सिमेंट्स लिमिटेडनं 6 एमएमटीपीए क्षमतेची स्वतंत्र सिमेंट ग्रायंडिंग युनिट उभारण्याचा प्रस्ताव मांडला जातोय. या प्रकल्पापासून नागरी वस्ती अवघ्या 10 ते 12 किलोमीटर अंतरावर आहे. परिसराची लोकसंख्या अंदाजे 20 लाखांहून अधिक आहे. या प्रकल्पामुळं निर्माण होणाऱ्या सिमेंट धूळ, उत्सर्जन आणि प्रदूषणामुळं पर्यावरण आणि स्थानिकांच्या आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होण्याची शक्यता आहे. यामुळं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी "मी बाधित नागरिकांसोबत असून, त्यांच्या आंदोलनात सहभागी आहे. अदानींच्या सिमेंट प्रकल्पाविरोधात एल्गार पुकारला आहे," अशी प्रतिक्रिया दिलीय.

खासदार बाळ्या मामांचा तीव्र विरोध : ठाणे जिल्हा अधिकाऱ्यांच्या आदेशानं कोकण विभागीय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळानं या प्रकल्पासाठी पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन सारांश प्रसिद्ध केला असून, जनसुनावणीची प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र, स्थानिक हजारो नागरिक आणि पर्यावरण प्रेमींसह विविध राजकीय पक्ष आणि स्थानिक खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा हेही याला तीव्र विरोध करत आहेत. सिमेंट प्रकल्पामुळं 14.82 लाख लोकसंख्या प्रभावित होणार : अम्बुजा सिमेंट्स लिमिटेडचा हा प्रस्तावित प्रकल्प कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीत असलेल्या मोहने गावात उभारला जाणार आहे. एकूण 26.13 हेक्टर जागेवर हा ड्राय सिमेंट ग्रायंडिंग प्रक्रिया असलेला प्रकल्प बांधला जाणार आहे. प्रकल्पाची उभारण सुरू झाल्यावर कच्चा माल हाताळणी, उत्पादन आणि वाहतुकीमुळं मोठ्या प्रमाणात सिमेंट धूळ आणि PM 2.5, PM 10, SO 2, NO 2, CO असं घातक वायू प्रदूषक बाहेर पडतील. त्यामुळं हरकती अर्ज दाखल केले आहेत. बाधित होणाऱ्या क्षेत्रात कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सर्व विभागासह उल्हासनगर आणि म्हारळ -बुद्रुक शहर समाविष्ट असून, 10 किमी परिघातील अंदाजे 14.82 लाख लोकसंख्या प्रभावित होईल. प्रकल्पापासून जवळच अनेक शाळा, रुग्णालये आहेत. या प्रकल्पाच्या 10 ते 15 किलोमीटर परिघात कल्याण पूर्व, कल्याण पश्चिम, अंबरनाथ आणि डोंबिवली मतदारसंघातील संपूर्ण परिसर व्यापला जाणार आहे. इथं लाखो कुटुंबं राहतात.

लक्षवेधी

## पुढील सूचना मिळेपर्यंत
# मोनोरेल बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मुंबई मोनोरेलला अलिकडे वारंवार तांत्रिक बिघाडाचा सामना करावा लागत आहे. सोमवारी ( १५ सप्टेंबर ) सकाळी वडाळा येथील एण्टॉप हिल आणि जीटीबीएन मोनोरेल स्थानकादरम्यान तांत्रिक बिघाडामुळे मोनोरेल मध्येच अडकली होती. त्यानंतर त्यातील १७ प्रवाशांना रेस्क्यू ऑपरेशन राबवून सुखरुपणे बाहेर काढण्यात आले. मोनोरेलवर सातत्याने होत असलेल्या अपघातांमुळे मोनोरेल सेवा तात्पुरती बंद करण्याचा निर्णय एमएमआरडीने घेतला आहे. चेंबूर ते सात रस्ता अशी मोनोरेल सध्या चालवण्यात येत होती. या संपूर्ण भारतातील एकमेव असलेल्या मोनोरेलवर नादुरुस्त गाड्यांमुळे अलिकडे वारंवार अपघात होत आहेत. त्यामुळे अपग्रेडेशन साठी ही सेवा आता २० सप्टेंबर २०२५ पासून काही काळ बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मोनोरेल अनेकवेळा अपघात झाले आहेत. अलिकडे १९ ऑगस्ट रोजी मोठा पाऊस पडल्याने सायंकाळी सव्वा सहाच्या सुमारास म्हैसूर कॉलनीजवळ मोनोरेल अडकली होती. यात ५८२ हून अधिक प्रवासी दोन ते तीन तास अडकले होते.अग्निशमन दलाने अखेर या प्रवाशांची सुटका केली. याच वेळी आचार्य अत्रे नगर स्थानकात आणखी एक मोनोरेल अडकली होती. त्यातून २०० प्रवाशांना सुखरुप बाहेर काढण्यात आले. मोनोरेल भारताची एकमेव मोनोरेल प्रणाली असून १९.७४ किमी मार्गावर संत गाडगे महाराज चौक ते चेंबूरपर्यंत ती चालवण्यात येते.

# शहापुरात चौघांकडून एकाची हत्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** क्षुल्लक कारणावरून चार जणांनी मिळून त्यांच्या मित्राची हत्या केल्याची घटना शहापूर तालुक्यातील कुकांबे परिसरात उघडकीस आली. याप्रकरणी शहापूर पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी चौघांपैकी एकाला अटक केली आहे. अन्य फरार झालेल्या तिघांचा शोध सुरू आहे. शहापूर तालुक्यातील कुकांबे हद्दीतील रस्त्यावर रामदास गोरखणे याला त्याचे मित्र योगेश सोनावळे, महेश निमसे, धनंजय सोगीर व सुनील निमसे लाथा बुक्क्यांनी मारहाण करीत असल्याचे रामदासचा भाचा सुनील सालकर याने पाहिले. त्याने मारेकऱ्यांना याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्याला दमदाटी केली. त्यानंतर मारेकरी रामदास याला एका वाहनामध्ये घेऊन गेले. मंगळवारी पहाटे पाच वाजताच्या सुमारास रातांधळे परिसरातून जाणाऱ्या समृद्धी महामार्गालगत रामदास आढळून आला. त्याला शहापूर उपजिल्हारुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. याप्रकरणी सुनील सालकर याने शहापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून सुनील निमसे याला अटक करण्यात आली असल्याचे शहापुर पोलिसांनी सांगितले.

## उल्हासनगरातील
# डांबरीकरण केलेले रस्ते पुन्हा खोदले



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** शहरातील रस्त्यांच्या डांबरीकरणाची कामे करून अवघ्या दोनच दिवसांत पुन्हा तेच रस्ते खोदले जात असल्याने नागरिकांमध्ये संताप उसळला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग आणि एमएमआरडीए यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे 'आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय' अशी अवस्था झाल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला आहे. गणेशोत्सवाच्या काळात न्यू इंग्लिश हायस्कूल ते नेताजी पुतळा या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले. काही दिवसांतच पुन्हा त्यावर खडी टाकून गुळगुळीत करण्यात आले. मात्र दोनच दिवसांत एमएमआरडीएच्या कामासाठी तोच रस्ता पुन्हा खोदण्यात आल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

# मीरा भाईंदर मनपा प्रभागरचना हरकती व सुचनांवर आज सुनावणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर, ता. १६ (बातमीदार) :** आगामी निवडणुकीसाठी जाहीर झालेल्या मिरा-भाईंदर महापालिकेच्या प्रारुप प्रभागरचनेवर अवघ्या ४६ हरकती नोंदविण्यात आल्या आहेत. या हरकतींवर बुधवारी (ता. १७) सुनावणी घेण्यात येणार आहे.

मिरा-भाईंदरच्या प्रारुप प्रभागरचनेला निवडणूक आयोगाने मान्यता दिल्यानंतर सर्वांच्या माहितीसाठी ती ३ सप्टेंबरला प्रसिद्ध करण्यात आली. या प्रारुप प्रभागरचनेवर १५ सप्टेंबर दुपारी तीन वाजेपर्यंत हरकती व सूचना नोंदविण्याची मुदत देण्यात आली होती. त्यानुसार महापालिकेच्या निवडणूक कार्यालयात सोमवारपर्यंत (ता. १५) सुमारे ४६ हरकती नोंदविण्यात आल्या आहेत, मात्र यातील काही प्रभागांच्या हद्दींवर, तर काही प्रभाग व सदस्य संख्येवर हरकती नोंदविण्यात आल्या. या हरकतींवर बुधवारी सकाळी ११ वाजता महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहात सुनावणी होणार आहे. सुनावणी अधिकारी म्हणून उल्हासनगर महापालिका आयुक्त मनिषा आव्हाळे यांची नियुक्ती केली आहे.

कोरोनामुळे २०२१ मध्ये जनगणना झालेली नाही. परिणामी सध्या तयार करण्यात आलेल्या प्रभागरचनेसाठी २०११ च्या जनगणनेनुसार मिरा-भाईंदरची लोकसंख्या आठ लाख नऊ हजार गृहित धरण्यात आली आहे. वास्तविक मिरा-भाईंदर शहराची सद्यस्थितीतील लोकसंख्या १५ लाखांच्या आसपास झाली आहे. त्यामुळे प्रभाग रचना तयार करताना ही लोकसंख्या गृहित धरणे आवश्यक असून प्रभागांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे वाढत्या लोकसंख्येनुसार सदस्यसंख्या ९५ एवढी न ठेवता ती वाढविणे आवश्यक आहे, असे हरकतींमध्ये नमूद केले आहे.

काँग्रेसकडूनही प्रभाग रचनेवर आक्षेप घेण्यात आला आहे. प्रभाग रचना ही २०२४ च्या मतदार नोंदणी व लोकसंख्येवर आधारित हवी, असे काँग्रेसचे म्हणणे आहे. यासंदर्भात काँग्रेसने राज्य निवडणूक आयोग, मुख्य सचिव नगरविकास खाते, तसेच पालिका आयुक्त यांना लेखी निवेदनाद्वारे आक्षेप नोंदवले आहेत.

## अवैध बांधकामप्रकरणी
# नवीमुंबई मनपा विरोधात अवमान याचिका दाखल

**15 हजार 500 इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र नाही.**

**5 हजार इमारतींना बांधकाम प्रमाणपत्र व भोगवटा प्रमाणपत्र नाही.**

> **"नवी मुंबईतील आठही क्षेत्रातील सर्वेक्षण करून अवैध इमारतीवर कारवाईचा बडगा उगारला जावा म्हणून आदेश पारित केले होते. त्यामध्ये घणसोलीमधील त्या इमारतींचा समावेश होता. घणसोलीमधील त्या इमारतीविषयी उच्च न्यायालयात सुनावणी होत असताना पालिका किंवा सिडकोच्या पॅनलवर असलेल्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून देणे अत्यंत अत्यावश्यक होते, परंतु तसे न करता एकाच इमारतीला टार्गेट केले. हे चुकीचे असून न्यायालयाच्या आदेशाचे पालन होत नाही म्हणून अवमान याचिका दाखल केली आहे.**
> **- ॲड. किशोर शेट्टी, वकील, उच्च न्यायालय**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई : ता. १६ (बातमीदार) :** अवैध बांधकामप्रकरणी अतिक्रमण विभागाने निष्काळजी केल्यचे म्हणत नुकतीच ॲड. किशोर शेट्टी यांनी मुंबई उच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल केली आहे. विशेष म्हणजे नवी मुंबईमधील सर्वच अवैध इमारतीबाबत न्यायालयाकडून निर्देश दिले असतानादेखील घणसोली येथील फक्त एकाच इमारतीवर कारवाईचा बडगा उचलला जात असल्याने ॲड. किशोर शेट्टी यांनी आश्चर्य व्यक्त केले.

उच्च न्यायालयात ३१ एप्रिल २०२४ मध्ये झालेल्या सुनावणीमध्ये पालिका हद्दीत सखोल सर्वेक्षण करून किती इमारती, बांधकामे बेकायदेशीरपणे उभारली गेली आहेत आणि किती भोगवटादार, मालकांनी एमआरटीपी कायद्याच्या कलम ५२ क अंतर्गत उपाययोजनांचा अवलंब करून बांधकामे नियमित केली आहेत, याची माहिती गोळी करण्याचे आदेश दिले होते. ३१ डिसेंबर २०१५ नंतर बेकायदेशीर बांधकामांचे सर्वेक्षण करायचे होते आणि हा अहवाल प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करण्यास सांगितले होते. यानुसार योग्य कायदेशीर कारवाई केली जाईल, असेही निर्देश न्यायालयाने दिले होते,

तर ३१ डिसेंबर २०१५ पर्यंत उभारलेल्या बेकायदेशीर बांधकामांनाच एमआरटीपी कायद्याचा फायदा घेण्यास परवानगी आहे. या बांधकामांबाबतीतही पाडणे वगळता कायद्यानुसार इतर सर्व कृती पालिकेकडून केल्या जातील. यासंबंधी सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाचा दाखलादेखील न्यायालयाने दिला होता.

सर्वेक्षणात बेकायदेशीर बांधकामे आढळल्यास त्या मालकांना, भोगवटादारांना पालिकेची नोटीस देईल आणि बांधकामे हटवण्यासाठी कारवाई करण्यापूर्वी त्यांना सुनावणीची संधी देण्यात येईल, असे निर्देश न्यायालयाने दिले होते, परंतु न्यायालयाने दिलेला कालावधी दीड महिना उलटून गेला तरीदेखील आजतागायत अवैध बांधकामावर कोणतीही कार्यवाही झाली झालेली नाही. हा न्यायालयाचा अवमान असल्याचे म्हणून याचिका दाखल केल्याचे शेट्टी यांनी सांगितले.







# प्रदूषण मंडळाचा कानाडोळा
## अंबरनाथ, बदलापुरातील प्रदुषणात भर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथः** शहराला पाणीपुरवठा करणारे चिखलोली धरण आणि नव्या विस्तारलेल्या निवासी भागांमध्ये पाणी व वायू प्रदूषणामुळे अंबरनाथकरांच्या आरोग्यावर गंभीर संकट उभे ठाकले आहे. विशेषतः पावसाळ्यात रासायनिक कंपन्यांकडून पाण्याच्या प्रवाहांमध्ये आणि हवेत मोठ्या प्रमाणात विषारी रसायने मिसळून प्रदूषण केले जात आहे. धोकादायक पातळीपर्यंत वाढलेले हे प्रदूषण नागरिकांच्या जीवाशी खेळत असून, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी) वारंवार तक्रारी होऊनही केवळ कागदोपत्री कारवाई करत असल्याचा आरोप होत आहे.

तर शेजारच्या बदलापूर शहरातही औद्योगिक वसाहतींमधून सोडला जाणारा रासायनिक वायू पावसाळ्याच्या काळात आणधी त्रासदायक ठरतो आहे. अनेक वर्षांपासून सुरू झालेले हे प्रदुषण पर्व संपणार कधी असा प्रश्न आता उपस्थित होतो आहे.

गेल्या काही वर्षांपासून विस्तारणाऱ्या आणि मध्यमवर्गीयांच्या पसंतीस उतरणाऱ्या अंबरनाथ आणि बदलापूर शहरांना गेल्या काही वर्षांपासून प्रदुषणाने विळखा घातला आहे. कधी नैसर्गिक

नाल्यांमध्ये प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट सोडायचे तर कधी कंपनीतून रासायनिक वायू हवेत सोडायचे असा येथील रासायनिक कंपन्यांचा नित्यक्रम आहे. अनेक वर्षे येथील औद्योगिक वसाहतीतील सांडपाणी प्रक्रिया केंद्र बंद होते. काहींमध्ये योग्यरित्या प्रक्रिया केला जात नसल्याचा आरोप होत होता. मात्र इतक्या वर्षांनंतरही त्यावर ठोस तोडगा काढता आलेला नाही. त्यामुळे आजही प्रदुषणाच्या घटना कमी होण्याच्या ऐवजी वाढल्या आहेत.

# उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने महिलांसाठी सामाजिक उपक्रम

## मुलींसाठी मासिक पाळी व स्वच्छतेबाबत जागरूकता




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने महिलांसाठी एक महत्वाचा सामाजिक उपक्रम घेण्यात आला. वाडा तालुक्यातील शासकीय मुलींचे वसतिगृह येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात मोठ्या संख्येने युवती उपस्थित होत्या. मासिक पाळीच्या काळातील स्वच्छता, सुरक्षितता आणि सामाजिक अडचणींविषयी जनजागृती करणे ह्या उद्देशाने ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात मुलींना मासिक पाळीच्या काळात योग्य स्वच्छतेसंबंधी सल्ला देण्यात आला तसेच आरोग्य विषयक माहिती पुरवण्यात आली. या प्रसंगी बोलताना डॉ. अपर्णा पाल यांनी सांगितले की, “मासिक पाळीमध्ये महिलांना अनेक सामाजिक अडचणींना सामोरे जावे लागते. योग्य माहिती, स्वच्छता आणि सुसंस्कार यामुळे आरोग्यविषयक समस्या दूर होण्यास मदत होते.”

कार्यक्रमादरम्यान सहभागी मुली अत्यंत उत्साही दिसल्या. समाजातील आरोग्यविषयक समस्या दूर करण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन महत्त्वाचे असल्याचे मत उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या वाडा युनिटच्या प्रशिक्षिका प्रणाली पाटील यांनी व्यक्त केले. प्रसंगी वसतिगृहातील मुलींसह प्रभारी दीपाली पाटील व युनिटच्या प्रशिक्षिका मनीषा भोईर उपस्थित होत्या.

# कलाशिक्षकांची एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

### विद्यार्थ्यांचे जडणघडणी मध्ये कलाशिक्षकांचे मार्गदर्शन मोलाचे असते - आ. ज्ञानेश्वर म्हात्रे



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शिक्षक हे विद्यार्थ्यांचे दुसरे आई- वडील असतात. प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये कोणती कला आहे, तो कुठल्या कलेमध्ये प्राविण्य करणार आहे, तो भविष्यामध्ये कोणत्या क्षेत्रामध्ये यश संपादन करणार आहे हे अचूक कला शिक्षक त्यांच्या काढलेल्या चित्रांचे माध्यमातून ओळखू शकतात. लहान लहान विद्यार्थ्यांना घडवताना त्याच्यातील विविध गुण प्रत्यक्षात कागदावर आणण्याचे खरे कार्य हे कलाशिक्षक करत असतात. विद्यार्थ्यांमध्ये पुस्तकी ज्ञानाच्या बरोबर कलेचे ज्ञान अवगत करून विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचं आणि मोलाचे मार्गदर्शन कलाशिक्षिकांमार्फत केले जाते.

गोरगरीब विद्यार्थ्यांना ज्ञान देत असताना त्यांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना जे जे काही आवश्यक लागणार आहे ते त्यांना देण्याचे कार्य करा. विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त मार्गदर्शन करून स्पर्धेच्या युगामध्ये टिकून राहण्यासाठी मदत करा. आधुनिक युगामध्ये प्रगती करण्यासाठी आधुनिक साधन सामग्री वापरून विद्यार्थ्यांना यशाच्या मार्गाने घेऊन जा. असे शिक्षक आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी कलाशिक्षकांचे कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करताना सांगितले.

महाराष्ट्र राज्य कलाध्यापक महा मंडळ संघ संलग्न ठाणे जिल्हा कलाध्यापक संघ व ठाणे जिल्हा परिषद (माध्यमिक) विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कलाशिक्षकांची एकदिवशीय कार्यशाळेचे नुतन विद्यालय, कल्याण येथे दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी संपन्न झाले. यावेळी ठाणे जिल्ह्यातील कला शिक्षकांसाठी अत्यंत मानाचा असलेला "कलातपस्वी" पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यशाळेचे उद्घाटन आ.ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळाचे राज्य सरचिटणीस दिगंबर बेंडाळे हे होते.

याप्रसंगी शिक्षण क्रांती संघटनेचे अध्यक्ष सुधीर घागस, महाराष्ट्र राज्य शिव छत्रपती शिक्षण संघटनेचे कोकण अध्यक्ष प्रशांत भामरे, कलाध्यापक संघाचे विभागीय उपाध्यक्ष विलास सेसाने, सल्लागार सतीश कोल्हे, ठाणे जिल्हा अध्यक्ष उमाकांत बोके, सचिव अमोल पाटील, खजिनदार शोभा बडगुजर, उपाध्यक्ष भरत तायडे, निलेश रोठे, अशोक शेलार सह ठाणे जिल्ह्यातील 200 कलाशिक्षक व शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# लोक जनशक्ति पार्टीच्या कोकण विभाग प्रभारी पदी गणेश भोईर




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : लोक जनशक्ती पार्टीच्या (रामविलास) कोकण विभाग प्रभारी पदी गणेश भोईर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रमोद कुदळे यांनी हि नियुक्ती केली आहे. फुले शाहू आंबेडकर यांच्या विचार प्रणालीने व राम विलास पासवान यांच्या कल्पनेतून स्थापन झालेल्या तसेच राष्ट्रीय अध्यक्ष चिराग पासवान यांच्या प्रेरणेने विचाराने कार्यरत असलेल्या या पार्टीमध्ये पक्ष नेतृत्वावर निष्ठा ठेवून गणेश भोईर यांची कोकण विभाग प्रमुख प्रभारी पदी व महाराष्ट्र राज्य सह संघटक देण्यात आली आहे.

# सेकंडरी स्कूल्स एम्प्लॉईज सोसायटीकडून शिक्षक व गुणवत विद्यार्थ्यांचा सन्मान



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : सेकंडरी स्कूल्स एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या ठाणे आणि कल्याण शाखेच्या माध्यमातून नूतन विद्यामंदिर, कल्याण पश्चिम येथे सभासद सहकार प्रशिक्षण व पाल्य गौरव समारंभ रविवार दिनांक 14 सप्टेंबर 2025 रोजी आयोजित करण्यात आला होता. या गौरव समारंभात सभासदांच्या गुणवंत (पाल्य) विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच क्रेडिट सोसायटीला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने शिक्षकांसाठी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, बुद्धिबळ स्पर्धा, कॅरम स्पर्धा, एकपात्री अभिनय स्पर्धा व चित्रकला या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यात स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विजेत्या सभासदांचा ट्रॉफी प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी अध्यक्षस्थानी क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील, मानस सचिव किशोर पाटील, सहसचिव सतीश माने, खजिनदार सतेज शिंदे, संचालक तथा महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे मुंबई विभाग अध्यक्ष अजित चव्हाण, संचालिका जयश्री गव्हाणे, संचालक जगन्नाथ जाधव, संचालक भाऊसाहेब आहेर, पालक संचालक पंकज सिंग, प्रमुख अतिथी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना नितीन चौधरी, राज्य समन्वयक हितेंद्र चौधरी, अध्यक्ष मुंबई पश्चिम विभाग घुगे, वझे केळकर महाविद्यालयाचे प्राध्यापक शालिग्राम सानप, कदम सर, औटी सर, मुख्याध्यापिका शेवाळे मॅडम, तसेच अनेक मुख्याध्यापक, ज्येष्ठ शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी कुटुंबीयांसह विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक तथा संचालक सतेज शिंदे यांनी केले.

# टिटवाळा येथे आरोग्य तपासणी शिबीर



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : मांडा टिटवाळा येथील विद्यामंदिर शाळेत शनिवारी सकाळी 8:30 ते 2 या वेळेत विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले या शिबिरात एकूण 1545 विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

सध्या पावसाळ्याचे दिवस असून सातत्याने कोसळणारा पाऊस यामुळे वातावरणातील तापमानात झालेला बदल आणि रस्त्याच्या आजूबाजूला साठलेला केरकचरा यामुळे विद्यार्थ्यांना विविध आजारांची लागण होऊ नये याची काळजी घेत या विद्यालयाचे मुख्याध्यापक दिनेश भामरे यांनी रेड स्वास्तिक संस्थेचे अध्यक्ष प्रमोद नांदगावकर यांच्या मदतीने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले या शिबिरात रेड स्वास्तिक संस्था, स्पर्श फाउंडेशन, प्राथमिक आरोग्य केंद्र गोवेली, व देवी महालक्ष्मी इन्स्टिट्यूट टिटवाळा यांनी सहभाग घेत विद्यामंदिर मांडा टिटवाळा येथे आरोग्य तपासणी शिबिराचा एक स्तुत्य उपक्रमात सहभाग घेतला. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक दिनेश भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अपार मेहनत घेऊन हे आरोग्य तपासणी शिबिर यशस्वी केले. सर्व विद्यार्थी व पालक यांच्याकडून या घेतलेल्या शिबिराचे कौतुक केले जात असून त्यात सहभागी झालेल्या संस्थांना धन्यवाद दिले.

# ‘आत्मबोधातून भारतबोध एक वैचारिक क्रांती’ - ज्येष्ठ साहित्यिक प्रवीण देशमुख



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : रविवार दिनांक १४ सप्टेंबर, २०२५ रोजी नमस्कार मंडळ, कल्याण येथे डॉ. चंद्रशेखर भारती लिखित 'आत्मबोधातून भारतबोध' या ग्रंथाच्या प्रकाशनाचा सोहळा अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती, कोकण प्रांतचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक प्रवीण देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी "आपण कोण? आपला मूळ स्वभाव काय? नियतीने आपल्यासमोर कोणते ध्येय ठेवले आहे? याची उत्तरे शोधणे म्हणजे आत्मबोध होय. 'आत्मबोधातून भारतबोध' हे पुस्तक आपल्याला एका वैचारिक क्रांतीकडे घेऊन जाते व विश्वकल्याण करण्याच्या आपल्या राष्ट्रीय ध्येयात आपणही काही हातभार लावू शकतो का असा प्रश्न करते? " असे देशमुख यांनी प्रतिपादन केले.

डॉ.चंद्रशेखर भारती लिखित 'आत्मबोधातून भारतबोध' या ग्रंथाच्या प्रकाशना प्रसंगी व्यासपीठावर अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती कोंकण प्रांतचे उपाध्यक्ष संजय द्विवेदी, साहित्य भारतीचे महामंत्री डॉ. श्यामसुंदर पांडेय सर, साहित्य भारतीचे कोकण प्रांत कोषाध्यक्ष तथा प्रज्ञावंत साहित्यिक शारदासुत सुनील म्हसकर सर, साहित्य भारती कल्याण शाखेच्या कार्याध्यक्षा सौ.प्राजक्ता कुलकर्णी, डॉ. चंद्रशेखर भारती, सुमेधसिंह भारती, जाई कुलकर्णी उपस्थित होते.

पुढे देशमुख म्हणाले, "आमच्या महापुरुषांच्या शिकवणुकीमुळे त्यांच्या आदर्श जीवन जगण्यामुळे भारतातील प्रत्येक जण हा दया, करुणा, क्षमा या गुणांनी ओतप्रोत भरलेला, चैतन्यशील आत्मा आहे . हे आपल्याला जाणवते व आपल्याला भारतबोध होतो." या प्रसंगी श्री संजय द्विवेदी म्हणाले, "तुम्हाला आत्मबोध आहे आणि शत्रुबोध नाही तर, तुमचा विजय हा पराजयासमान आहे. 'नागरिक' म्हणजे नगराचा रहिवाशी. म्हणजेच शहरवासी. मग ग्रामीणचे काय? 'नागरिक' हा शब्द सिटीझन शब्दाचा अर्थ आहे. सिटीझन हा मूळ फ्रेंच शब्द आहे, हे इथे लक्षात घेतले पाहिजे. मूळचा भारत हा गावागावात वसलेला आहे. याचा आपण विचार करत नाही. डॉ. श्यामसुंदर पांडे सर म्हणाले, नॅरेटिव्ह कसे सेट केले जाते बघा? सलीम-जावेद हिंदी चित्रपटात एक अनाथ मुलगा दाखवतात. त्याचा सांभाळ फादर करतो. म्हणजे ख्रिश्चन धर्मीय. मोठा झाल्यावर दंडावर ७८६ चा बिल्ला वापरतो, म्हणजे मुस्लिम धर्मीय. मात्र, तो येशू किंवा अल्लाहला प्रश्न विचारत नाही तर, शंकराला प्रश्न विचारतो? बरं, हे नॅरेटिव्ह इथेच संपत नाही. 'जो जीता वही सिकंदर' मुळात सिकंदर माघारी परतला तो भारतीय राजामुळेच. तो भारत जिंकू शकला नाही. म्हणजे तो अजिंक्य राहिलेला नाही. तरी काय सेट केलं जातं? जो जीता वही सिकंदर."

शारदासुत प्रा. सुनील म्हसकर सर म्हणाले, "आत्मबोध ही आपल्यात असलेली शक्ती आहे. ही शक्ती, ही क्षमता सिंधुराज दाहीर, राजा पृथु, राणी अबक्का , छत्रपती शिवाजी महाराज, राजा सोहेलदेव, राणी वेलू नच्चियार यांनी ओळखली. आपल्या मातृभूमीचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व व सत्त्व टिकवण्यासाठी ते मुस्लिम आणि फिरंगी आक्रमकांना भिडले व त्यांना त्यांची जागा दाखवून दिली. आपला देश, आपला स्वाभिमान, आपली संस्कृती, आपल्या परंपरा यांना धक्का लागणार नाही, याची काळजी घेत त्यांनी त्यावेळी परकीय शत्रूशी झुंज दिली; हाच तर आत्मबोध आहे. प्राजक्ता कुलकर्णी म्हणाल्या, "भारत हा खऱ्या अर्थाने राष्ट्रीयतेचा समुच्चय आहे. अनेक जाती, अनेक पंथ, अनेक भाषा यांचा समुच्चय आहे. भारत हे प्राचीन राष्ट्र आहे .जे की, विश्वकल्याणासाठी झटत आहे. वसुधैव कुटुंबकमसाठी झटत आहे. आत्मबोधातून निर्माण झालेला हाच तर भारतबोध आहे."

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जाई कुलकर्णी यांनी केले तर प्रास्ताविक सुमेधसिंह भारती यांनी केले. यावेळी आभार प्रदर्शन डॉ चंद्रशेखर भारती यांनी केले.

# कलाशिक्षक शंभूराव सोनवणे तपस्वी पुरस्काराने सन्मानित




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : जिल्हा परिषद ठाणे, माध्यमिक विभाग. व कलाध्यापक संघ ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने वासिंद जवळील शेई विभाग हायस्कूल शेई या विद्यालयातील कलाशिक्षक शंभूराव सोनवणे यांना दिनांक, 15.9.2025 रोजी माननीय कोकण विभागाचे शिक्षकआमदार ज्ञानेश्वर म्हात्रे. कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे, कला संचालक महाराष्ट्र राज्याचे किशोर इंगळे, शिक्षण क्रांती संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष सुधीरजी घागस कल्याण डोंबिवली महापालिका शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी भारत बोलणार महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळाचे राज्य सरचिटणीस आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष दिगंबर बेंडाळे कलाध्यापक संघाचे विभागीय उपाध्यक्ष विलास सेसाणे, कलाध्यापक संघ महामंडळाचे जिल्हाध्यक्ष उमाकांत जी बोके व उपाध्यक्ष माननीय भरत तायडे व निलेश रोठे व सचिव अमोल पाटील आदी प्रमुख मान्यवरांच्या शुभ हस्ते नूतन विद्यालय कल्याण (पश्चिम) येथे अनेक उपस्थित असलेल्या कलाकारांच्या साक्षीने शंभूराव सोनवणे यांना मानाचा कला तपस्वी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी शेई विभाग हायस्कूल शेईचे शाळेचे मुख्याध्यापक आव्हाड यांचाही या मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. सोनवणे यांना मिळालेल्या पुरस्कारामुळे त्यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे शाळेचे अध्यक्ष माननीय नितीन जाधव साहेब. शालेय समितीचे चेअरमन जगन्नाथजी तारमळे, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व परिसरातील नागरिक यांच्याकडून त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून पुढील कार्यास शुभेच्छा व्यक्त होत आहेत.

# सारमाळ येथे अनोळखी वृद्ध इसमाचा मृतदेह सापडला

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : मुंबई नाशिक महामार्ग वासिंद लगत असलेल्या सारमाळ गांव हद्दीत एका अनोळखी इसमाचा मृतदेह सापडला आहे.

वासिंद जवळील सारमाळ गाव हद्दीच्या महामार्ग लगत असलेल्या बसथांबा शेडमध्ये 22 ऑगस्ट दरम्यान एका वय अंदाजे 60 वर्षीय रामू (पूर्ण नाव माहीत नाही) या इसमाचा मृतदेह आढळला आहे. सदर व्यक्तीच्या अंगात कपडे नसून दाढी व मिशी सफेद तर कोणत्यातरी शारीरिक आजाराने मयत झालेला दिसून आला आहे.

त्याच्या मरणाबाबत काहीएक संशयाचा प्रकार नसून कोणाविरुद्ध काहीएक तक्रार नाही याबाबत येथील अरुण चोरगे यांनी दिलेल्या माहितीनुसार वासिंद पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे तर पुढील तपास पोलीस निरीक्षक सचिन हुंदळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पो उपनिरीक्षक एल.डी. वातास हे करीत आहेत.

# आमदार किसन कथोरे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबीर

## रुग्णांना फळवाटप व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड विधानसभेचे लोकप्रिय आमदार मा. किसन कथोरे यांच्या वाढदिवसानिमित्त संपुर्ण मतदार संघात विविध सामाजिक उपक्रम सुरु आहेत. त्याच अनुषंगाने सामाजिक बांधिलकी जपत किशोर गावातील संजय गायकर व सुषमा संजय गायकर यांनी भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याचबरोबर प्राथमिक आरोग्य केंद्र किशोर येथिल रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप तसेच जि.प. शाळेतील शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे संच वितरित करण्यात आले.

या उपक्रमाचे आयोजन किशोर गावच्या माजी सरपंच सौ. सुषमा संजय गायकर व भाजपा किशोर शक्ति केंद्रप्रमुख संजय गायकर यांनी केले होते. शिबिरामध्ये विविध तज्ञ डॉक्टरांनी उपस्थित राहून सर्वसामान्य नागरिकांची आरोग्य तपासणी केली, आवश्यक त्या सल्ल्या–सूचना दिल्या व मोफत औषधेही उपलब्ध करून दिली. आरोग्य केंद्रात दाखल रुग्णांना फळांचे वाटप करून त्यांना मानसिक उभारी देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांचा विचार करून शालेय साहित्य संचांचे वाटप करण्यात आले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांना या वाटपामुळे मोठा दिलासा मिळाला.

या प्रसंगी बोलताना नागरिकांनी आपले मत व्यक्त केले की, “आमदार कथोरेंचा वाढदिवस दरवर्षी समाजोपयोगी उपक्रमातून साजरा होतो. ही परंपरा खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आहे.”

भाजपा किशोर शक्ति केंद्रप्रमुख संजय गायकर यांनी सांगितले की, “आमदार किसन कथोरे यांनी गेल्या काही वर्षांत गावाच्या विकासासाठी केलेले काम स्तुत्य आहे. रस्ते, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात त्यांनी घेतलेली पुढाकारामुळे आज गाव सर्वांगीण विकासाच्या मार्गावर आहे. त्यांच्या या कार्यासाठी संपूर्ण गावकऱ्यांच्या वतीने आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार व व आमदार किसन कथोरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो .”

यावेळी भाजपा मंडळ अध्यक्ष जितेंद्र भावार्थे, गणेश लाटे, एकनाथ पोगेरे, संतोष विशे, सुभाष गायकर, भास्कर गायकर, अर्जुन खुंटले, बाळू गायकर,नामदेव गायकर, सोमनाथ गायकर हे उपस्थित होते. स्थानिक नागरिक, महिला, विद्यार्थी व युवक मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी होऊन कृतज्ञतेची भावना व्यक्त केली.







**मेष**
तुम्ही फिरायला जाण्याचा विचार करत असाल तर तुम्हाला काळजी घेणे आवश्यक आहे अन्यथा तुम्हाला दुखापत होण्याचा धोका जास्त आहे. जर

**वृषभ**
बऱ्याच काळापासून कोणत्याही कामाबद्दल चिंतेत असाल तर मित्राच्या मदतीने ते काम पूर्ण होताना दिसते. कामाने वरिष्ठांना खूश करण्यात यशस्वी व्हाल.

**मिथुन**
शिक्षणात येणाऱ्या समस्यांवर मात करण्यासाठी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम करावे लागतील.अडकलेले पैसे अचानक मिळाल्यानंतर आनंदी व्हाल.

**कर्क**
तुमचे पद आणि प्रतिष्ठा वाढल्यामुळे तुम्ही आनंदी व्हाल. कोणतेही वाहन खूप काळजीपूर्वक चालवावे गाडी खराब झाल्याने आर्थिक खर्च वाढू शकतात.

**सिंह**
तुमच्या परिसरातील एखाद्याशी तुमचा वाद होत असेल तर तुम्हाला त्यात गप्प राहावे लागेल अन्यथा ते कायदेशीर प्रकरण बनू शकते.

**कन्या**
प्रेम जीवन जगणारे लोक त्यांच्या जोडीदारासोबत रोमँटिक दिवस घालवतील. तुम्ही स्वतःशी संबंधित माहिती कोणत्याही अनोळखी व्यक्तीला देऊ नये.

**तूळ**
नवीन काम सुरू करताना कोणत्याही बाहेरील व्यक्तीचा सल्ला घेऊ नका. भावंडांसोबत वाद झाला असेल तर त्यासाठी माफी मागावी लागू शकते.

**वृश्चिक**
तुमचा एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो, त्याच्याशी बोलून तुम्हाला आनंद होईल.

**धनु**
कौटुंबिक मालमत्तेशी संबंधित वादांमध्ये तुम्हाला वरिष्ठांचे म्हणणे ऐकावे लागेल. विद्यार्थ्यांना अभ्यासावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करावे लागेल.

**मकर**
नोकरी बदलण्याचा विचार करणाऱ्या लोकांना चांगली ऑफर मिळू शकते. तुमच्या भूतकाळातील काही चुकांमधून तुम्हाला धडा घ्यावा लागेल.

**कुंभ**
मुलांकडून एखादी चांगली बातमी ऐकायला मिळू शकते.प्रेम जीवन जगणाऱ्या लोकांना काही कारणांमुळे दोघांमध्ये तणावाचा सामना करावा लागू शकतो.

**मीन**
प्रतिकूल परिस्थितीतही तुम्हाला तुमच्या रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. जर तुम्हाला तुमच्या आर्थिक परिस्थितीबद्दल काळजी वाटत असेल.

नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता



# भिवंडी प्रभाग रचनेवर हरकतींचा पाऊस

## ८४ हरकती दाखल | गुरुवारी होणार सुनावणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पडघम वाजू लागले असुन भाजप, काँग्रेस, शिवसेनेसह विविध पक्षाच्या माध्यमातून विविध प्रभागात मोर्चा बांधणी सुरू झाली आहे.असे असताना भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिकेच्यातीने शासन आदेशानुसार शहरात नव्याने प्रभाग रचना बनवण्यात आले असून या प्रभाग रचने संदर्भात सुमारे 84 हरकती महापालिका निवडणूक विभागात दाखल करण्यात आल्या आहेत.त्याची सुनावणी महापालिका सभागृहात १८ सप्टेंबर रोजी दुपारी होणार आहे तरी नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन महापालिका आयुक्त प्रशासनानेवतीने करण्यात आले आहे.

भिवंडी शहर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी २०११ च्या जनगणनेच्या आधारे लोकसंख्या प्रमाण मानून प्रभाग रचना बनवण्यात आली आहे.३ सप्टेंबर रोजी जाहीर झालेल्या प्रभाग रचनेत एकूण २३ प्रभागात ९० सदस्य असणार आहेत.विशेष म्हणजे २०१७ मध्ये बनविण्यात आलेली प्रभाग रचना कायम ठेवत,काही ठिकाणी सीमांकनां मधील नावांमध्ये बदल झालेले आहेत.या प्रभाग रचनेस १५ सप्टेंबर पर्यंत हरकती नोंदवण्याच्या काळात ८४ हरकती दाखल झाल्या आहेत.शुक्रवार पर्यंत ३९ हरकती दाखल होत्या ,

मंगळवारी शेवटच्या दिवशी तब्बल ४५ हरकती दाखल झाल्याने हरकतींचा संख्या ८४ वर पोहचली आहे.या हरकतींवर सुनावणी घेण्या साठी निवडणूक आयोगा कडून आलेल्या निर्देशानुसार ठाणे जिल्हाधिकारी यांनी मीरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त राधाबिनोद शर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.येत्या गुरुवार १८ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता आयुक्तांच्या बैठक पालिका सभागृहात हरकतींवर सुनावणी घेणार आहेत.त्यावेळी हरकतदार नागरिकांनी योग्य त्या कागदपत्रांसह उपस्थित रहावे असे आवाहन निवडणूक विभागाचे महापालिका उपायुक्त विक्रम दराडे यांनी केले आहे.

# ठाणे जिल्ह्यात जनावरांसाठी लसीकरण मोहीम सुरू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : ठाणे जिल्ह्यातील पशुपालक, गोपालक आणि शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाची मोहीम राबविण्यात येत आहे. २० व्या पशूगणनेनुसार जिल्ह्यात एकूण १,७२,०४३ जनावरे नोंदवली गेली असून, या जनावरांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि संसर्गजन्य आजारांपासून बचाव करण्यासाठी लाळ-खुरकूत (FMD) लसीकरण मोहीम सुरु करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन मुंबई डॉ. प्रशांत कांबळे यांच्या विशेष मार्गदर्शनाने लसीकरण मोहीम सुरू केली आहे.

जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये लाळ-खुरकूत रोग प्रतिबंधक लसीचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे पशुपालकांना आपल्या जनावरांचे लसीकरण करण्यासाठी जवळच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधून ही सुविधा घेता येणार आहे. या मोहिमेचा उद्देश जनावरांना रोगमुक्त ठेवणे, त्यांची उत्पादनक्षमता वाढविणे आणि शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळणे हा आहे.

या संदर्भात जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. वल्लभ जोशी यांनी सांगितले की,"ही लस ३ महिन्यांपेक्षा जास्त वयाच्या सर्व निरोगी वासरे, बैल, रेडे, गायी-म्हशी तसेच गाभण जनावरांना देता येते. पशुपालकांनी अजिबात विलंब न करता आपल्या जनावरांचे लसीकरण करून घ्यावे. रोग प्रतिबंधक उपाययोजना राबविणे ही केवळ शासकीय जबाबदारी नसून सर्वांचीच सामूहिक जबाबदारी आहे."

डॉ. जोशी यांनी पुढे सांगितले की, शेतकऱ्यांच्या सहकार्यामुळे ही मोहीम यशस्वी होईल आणि ठाणे जिल्ह्यातील पशुधन अधिक निरोगी व सक्षम बनेल. एकत्रित प्रयत्नांमुळे ठाणे जिल्हा रोगमुक्त आणि आरोग्यदायी पशुधन असलेला आदर्श जिल्हा ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका

## मालमत्ता विभाग

**निविदा सुचना क्र. २६ सन २०२५-२०२६**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३ (११) अन्वयेच्या तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रात महापालिकेच्या मालकीच्या खालील नमूद केलेल्या ७ स्मशानभूमीच्या ठिकाणी अंत्य विधीसाठी लागणारे साहित्य व जळाऊ लाकडे साठवून विक्री करणेसाठी उपलब्ध असलेली बांधीव जागा ५ वर्षे कालावधी करीता संस्था/व्यक्तींना भाडेतत्वावर देण्याचे योजिले आहे.

| अनु. क्र. | स्मशानभूमीचे नाव | क्षेत्रफळ चौ. फुट | निविदा इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १ | लालचौकी स्मशानभूमी, आधारवाडी रोड, कल्याण (प) | ३६४ | रु.९०००/- | रु. १०००+१८०= ११८०/- (१८% GST सह) |
| २ | मुरबाड रोड, गणेश घाट, स्मशानभूमी, कल्याण (प) | ३११ | रु.७५००/- | रु. १०००+१८०= ११८०/- (१८% GST सह) |
| ३ | वल्लीपीर बैलबाजार स्मशानभूमी, कल्याण (प) | ४३० | रु,१०,०००/- | रु. १०००+१८०= ११८०/- (१८% GST सह) |
| ४ | विठठलवाडी स्मशानभूमी, कल्याण (पूर्व) | ३५० | रु.८५००/- | रु. १०००+१८०= ११८०/- (१८% GST सह) |
| ५ | पाथर्ली स्मशानभूमी, डोंबिवली (पूर्व) | १५० | रु.४,०००/- | रु. १०००+१८०= ११८०/- (१८% GST सह) |
| ६ | शिवमंदिर स्मशानभूमी, डोंबिवली पूर्व | २१६०.२३ | रु.५१,०००/- | रु. १०००+१८०= ११८०/- (१८% GST सह) |
| ७ | चोळे स्मशानभूमी, डोंबिवली पूर्व | १५० | रु.४,०००/- | रु. १०००+१८०= ११८०/- (१८% GST सह) |

१) निविदा विक्री व स्विकृती दि. १७/०९/२०२५ ते दि. ०६/१०/२०२५ रोजी वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यत राहील.

२) निविदा पूर्व बैठक दि.२३/०९/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता मा.उप आयुक्त (मालमत्ता) कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या दालनात घेतली जाईल.

३) शक्य झाल्यास दि. ०७/१०/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता ई टेडरींग विभाग नागरिक सुविधा केंद्र येथे उघडण्यात येईल.

४) निविदा महापालिकेच्या WWW.Mahatenders.gov.in या बेबसाईटवरुन विक्री व स्विकृती करता येतील.

५) सदरहू स्मशानभूमीची पाहणी करणे देकारदारांस बंधनकारक असल्यामुळे निविदाकार कार्यालयीन दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजता या कालावधीत करु शकतील

**सर्व निविदा किंवा कोणतीही निविदा कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखुन ठेवला आहे.**

जावक क्रमांक –
कडोंमपा/जसंवि/मुका/५२३
दिनांक : १६ सप्टेंबर २०२५

सही/–
उप आयुक्त (मालमत्ता)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

# चितशक्ती ट्रस्टच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन उपक्रम



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : सोमवार १५ सप्टेंबर रोजी चितशक्ती ट्रस्ट गोराड यांच्या वतीने पर्यावरण संवर्धन उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम वाडा खानिवली पोलिस चौकीच्या कार्यक्षेत्रातील गोराड येथे घेण्यात आला. उपक्रमात वाडा पोलीस निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे यांच्या हस्ते प्रतीकात्मक वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एकाच वेळी तब्बल एक हजार झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी पोलीस विभागातील अधिकारी - कर्मचारी, चितशक्ती ट्रस्टचे पदाधिकारी, ग्रामस्थ व अनेक पर्यावरणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या झाडांची निगा व संगोपनाची जबाबदारी प्रसाद चिकित्सा यांनी स्वीकारली असून, फक्त झाडे लावणे नव्हे तर ती जगविणे हेच खरे पर्यावरण संवर्धन आहे. हा संकल्प प्रसाद चिकित्साच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. या उपक्रमामुळे गोराड परिसर हिरवागार होण्यास मदत होणार असून, पर्यावरणाबाबत जनजागृतीही निर्माण होणार आहे.

# राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता: 'सेवा पंधरवड्या'त ठाण्यात फेरफार अदालत व सनद वाटप कार्यक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातंर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन दि.17 सप्टेंबर 2025 ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दि.2 ऑक्टोंबर 2025 या कालावधीमध्ये "सेवा पंधरवडा" साजरा करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने ठाणे तालुक्यातील उप अधीक्षक भूमी अभिलेख, ठाणे कार्यालयाच्या अंतर्गत नगर भूमापन ओवळा, येऊर, भाईंदरपाडा व बोरीवडे गावातील नागरीकांसाठी मिळकतीच्या नोंदी अद्यावत करण्याकरिता मंगळवार, दि.23 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 11 वाजता उप अधीक्षक भूमी अभिलेख ठाणे, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, कोर्ट नाका, ठाणे (प.) 400601 या कार्यालयात फेरफार अदालत आयेजित करण्यात आली आहे. तरी सर्व नागरीकांनी मुळ दस्तऐवज व कागदपत्रांसह कार्यालयात उपस्थित राहावे.

तसेच मौजे बोरीवडे ता. जि. ठाणे येथील गावठाण मिळकतीच्या सनद वाटपाचा कार्यक्रम मंगळवार, दि.23 सप्टेंबर 2025 रोजी अंगणवाडी शाळा, बोरीवडे येथे दुपारी 12.30 वाजता आयोजित करण्यात आला आहे. या फेरफार अदालत व सनद वाटप कार्यक्रमांमध्ये नागरीकांनी सहभागी होऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख नितीन पाटील व उप अधीक्षक भूमी अभिलेख सचिन वाघ यांनी केले आहे.

# ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक बांधकाम विभाग (मु.)

ई- निविदा सूचना

ठाणे महानगरपालिका मुख्यालय इमारतीमधील चौथ्या मजल्यावरील आरोग्य विभागामध्ये फर्निचर नुतनीकरणाअनुषांगिक कामे करणे या कामाकरीता ई-निविदा मागविण्यात येत आहेत. उपरोक्त कामी ई-निविदा सादर करणाऱ्या ज्या कंत्राटदारांविरुद्ध शासकीय/ निमशाकीय/ सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम/ स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाची कार्यवाही केली/ सुरु आहे, अशा कंत्राटदारांना सदर ई- निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. उपरोक्त नमुद कामाची सविस्तर ई- निविदा सूचना व निविदा प्रसिध्दी प्रपत्र https://www.mahatenders.gov.in व ठाणे महानगरपालिकेचे अधिकृत संकेतस्थळ येथे दि.१८/०९/२०२५ ते दि.२५/०९/२०२५ रोजीपर्यंत सायं.१६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा दि.२५/०९/२०२५ रोजी सायं.१६.०० वाजेपर्यंत उपरोक्त नमुद संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास दि.२६/०९/२०२५ रोजी १६.३० वाजता ऑनलाईन उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-मु/६५८/२०२५-२६ सही/-
दि:१६.०९.२०२५ उपनगरअभियंता
**plsvisitourofficialweb-site** ठाणे महानगरपालिका,ठाणे
**www.thanecity.gov.in**

# स्व. प्र. मा. पाटील यांच्या पुण्यस्मरणानिमित्त अभिवादन सभा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : गाडगे महाराज मिशन, मुंबई यांच्या अधिपत्याखाली चालणाऱ्या गाडगे महाराज शिक्षण संकुलात स्व. प्र. मा. पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचा गुणगौरव करण्यात आला. या कार्यक्रमात गाडगे महाराज विद्यालयाच्या शिक्षिका शोभा तांबे यांनी प्र. मा. पाटील दादांचे ओतूर व पंचक्रोशीतील कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन केले.



स्व. प्र. मा. पाटील यांच्या पंधराव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त आयोजित अभिवादन सभेला शालेय व्यवस्थापन समिती सदस्य नितीन पाटील, मुख्याध्यापक संपत माने, बाबुलाल थोरात, सुमन घाडगे, कैलास महाजन आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात वै. प्र. मा. पाटील यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली.

यावेळी राजू ठोकळ, सचिन मुखरे, रामदास बगाड, मनीषा ठाकरे आणि सुमन घाडगे यांनी प्र. मा. पाटील यांच्या विचारांचा जागर आपल्या मनोगतातून व्यक्त केला. नितीन पाटील बोलताना भावनिक झाले. त्यांनी सांगितले की, "दादांनी आयुष्यभर संस्थेसाठी कष्ट केले. गाडगे बाबांप्रमाणे त्यांनी संसारावर तुळशीपत्र ठेवून काम केले. पंधरा-पंधरा दिवस घरी येणे शक्य नसायचे. त्या काळात आमच्या आईने आम्हाला वाढवले. आज वडिलांच्या आठवणी अधिक जाणवतात. पण दादांनी लावलेले हे रोपटे वटवृक्ष बनले आहे, ते सांभाळण्यासाठी आपण सर्वांनी भक्कम उभे राहिले पाहिजे."

राजू ठोकळ म्हणाले, "दादांचे विचार मांडताना भावनिक न होता कार्य करत राहिले पाहिजे. कारण भावना क्षणभंगुर असते, तर कर्तव्य श्रेष्ठ असते."

सुमन घाडगे यांनी १९८६ मधील दादांचे कार्य सांगताना आठवण काढली, "मैदानावर एखादा खिळा किंवा तार पडलेली दिसली तरी दादा स्वतः उचलून मुलांच्या सुरक्षिततेची काळजी घेत असत. त्यांची दूरदृष्टी आणि भविष्याचा वेध घेऊन कार्य करण्याची वृत्ती प्रेरणादायी आहे."

संस्थेच्या इतिहासाची उजळणी करताना सांगण्यात आले की, स्व. प्रल्हाद पाटील यांनी १९७० ते १९८५ या कालावधीत सेक्रेटरी म्हणून कार्य केले. १९६५ मध्ये ते ओतूर शाखेचे संस्थापक झाले आणि १९६८ पासून गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची गंगा गाडगे महाराज आश्रम शाळेच्या माध्यमातून पोहोचवली. "तुका म्हणे एका मरणेची सरे, उत्तमची उरे कीर्ती माघे," या उक्तीप्रमाणे त्यांची कीर्ती कायम राहील.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविक सुनील खूपसे यांनी केले, तर सूत्रसंचालन रवींद्र अहिनवे आणि ऋणनिर्देश निवृत्ती कुकडे यांनी केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक संपत माने यांनी सांगितले की, "बाबांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.कार्यक्रमास शिक्षण संकुलातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# रायते येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान विशेष कार्यशाळा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सरपंच हा खऱ्या अर्थाने जनतेचा सेवक असून, गावाचे सर्वांगीण परिवर्तन घडवून आणणे ही त्यांची जबाबदारी आहे. गावाचा विकास हा जिल्ह्याच्या विकासाशी जोडलेला आहे, त्यामुळे लोकप्रतिनिधींनी जबाबदारीने, पारदर्शकतेने व जनतेच्या हितासाठी काम करणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री यांनी या अभियानाची सुरुवात सकारात्मक स्पर्धा निर्माण करण्याच्या उद्देशाने केली आहे. या अभियानामुळे ग्रामीण भागात आर्थिक समृद्धी पोहोचेल, गावोगावी विकासाची नवी उर्जा मिळेल आणि ग्रामीण भागाची समृध्दीकडे वाटचाल होईल असे प्रतिपादन सरपंच सौ.समिता संतोष सुरोशी यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान विशेष कार्यशाळेत केले.

मुख्यमंत्री पंचायतराज अभियानाच्या विशेष कार्यशाळेचे आयोजन आज रायते येथे करण्यात आले होते. या कार्यशाळेला सरपंच सौ.समिता संतोष सुरोशी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होते.


यावेळी पंचायत अधिकारी .राजाभाऊ म. सुरवसे, उपसरपंच कु.मयुर सुरेश सुरोशी , सदस्य .सुभाष जाधव, सदस्य यतिन बुटेरे, जि.प.शाळेच्या मुख्य शिक्षिक. चित्रा बोंडे मॅडम, रायते हायस्कूल च्या सौ. मंदाकिनी पाटील मॅडम, पिंपळोली च्या पोलिस पाटील भारतीताई रोहणे, समाजसेवक बाळाराम रोहणे, जेष्ठ ग्रामस्थ नामदेव वाघे,पत्रकार संजय कांबळे,पशु वैद्यकीय डॉक्टर म्हात्रे मॅडम, वनरक्षक फॉरेस्टर,गृप गृ.ग्रा.पंचायत रायते-पिंपळोली हद्दीतील सर्व सिआरपी, सर्व बचत गटाचे, ग्रामसंघाचे अध्यक्षा, उपाध्यक्ष, सचिव, सदस्या , अंगणवाडी कार्यकर्त्या ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सरपंच सौ.समिता संतोष सुरोशी यांनी सांगितले की, १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री पंचायत राज अभियानामध्ये जिल्ह्याने सहभागी होऊन प्रथम क्रमांक पटकावणे आवश्यक आहे. पारदर्शक कामगिरी आणि सकारात्मक स्पर्धेमुळेच गावांचा सर्वांगीण विकास होतो. या अभियानाच्या माध्यमातून सकारात्मक स्पर्धा घडणार आहे. या अभियानात प्रत्येक ग्रामपंचायतीने आपला सहभाग नोंदवून या अभियानातील निकषांचा अभ्यास करून त्याप्रमाणे कार्यवाही केली तर गावाचे स्वरूप बदलताना दिसेल. असा त्यांना विश्वास व्यक्त केला, तर महिला बचत गटाच्या सदस्यांनी देखील आपण या अभियानात सक्रिय सहभाग घेणार असल्याचे सांगितले. यावेळी पत्रकार संजय कांबळे यांनी ही मार्गदर्शन केले.

# दुबईत श्रीमंत ढोल ताशा पथकाचा वादकोत्सव जल्लोषात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : दुबईत श्रीमंत ढोल ताशा पथकाचा वादकोत्सव २०२५ मोठ्या उत्साहात आणि भव्यतेत पार पडला. पथकातील सर्व वादक, मान्यवर व पाहुण्यांच्या उपस्थितीमुळे हा सोहळा अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकर्षक व प्रभावी पद्धतीने पार पडले. प्रेरणादायी मनोगतांनी पथकाच्या प्रवासाची झलक दाखवून उपस्थितांच्या मनात एकतेची भावना दृढ केली.

सोहळ्यात सर्व वादकांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. मेहनत व समर्पणाला मिळालेला हा मानाचा मुजरा पथकाच्या एकजुटीचे प्रतीक ठरला. भारताबाहेर राहूनही संस्कृती जपण्याचे कार्य श्रीमंत ढोल ताशा पथक सातत्याने करत आले असून, हे कार्य निरंतर सुरू राहील असा विश्वास व्यक्त करण्यात आला. तसेच एक सशक्त आणि सुदृढ तरुण पिढी घडवण्याचे कार्यही पथक करत आहे, ही बाब विशेषत्वाने अधोरेखित करण्यात आली. जल्लोषात वादन व नृत्य अशी रंगतदार सादरीकरणे आणि स्वादिष्ट जेवणामुळे वातावरण अधिक उत्साही बनले. स्टेजवर तसेच स्टेजच्या मागे कार्यरत राहून, तसेच दूरवरून येऊन सहकार्य करणाऱ्यांमुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याचे आयोजकांनी सांगितले.






# रायगड जिल्ह्यात स्वस्थ नारी निरोगी परिवार अभियान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार जिल्हाधिकारी किशन जावळे व मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.निशिकांत पाटील यांच्या नियोजनाने महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढविण्यासाठी आणि त्यांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी 'स्वस्थ नारी निरोगी परिवार' हे विशेष अभियान जिल्ह्यात राबविण्यात येणार असून हे अभियान दि.17 सप्टेंबर ते दि.2 ऑक्टोबर 2025 या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्रात आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.मनिषा विखे यांनी दिली आहे.

या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना त्यांच्या आरोग्याविषयी शिक्षित करणे आणि त्यांच्यासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करणे आहे. या शिबिरांमध्ये पुढीलप्रमाणे आरोग्य तपासण्या केल्या जातील. स्तन आणि गर्भाशयाच्या कर्करोगाची प्राथमिक तपासणी, रक्तदाब आणि मधुमेहाची तपासणी, रक्ताची हिमोग्लोबिन तपासणी, सिकलसेल रोग तपासणी, सिकलसेल कार्डाचे वितरण, तोंडाचा कर्करोग, गर्भाशयाचा कर्करोग आणि स्तनाचा कर्करोग निदानासाठी तपासणी, मासिक पाळीतील स्वच्छता व पोषण, रक्तदान मोहीम शिबीर, माता व बालकांचे संरक्षण कार्ड, क्षयरोग तपासणी, माता बालकांचे लसीकरण, निक्षय मित्र बनवण्यासाठी मोहीम, रक्तदान शिबिराचे आयोजन, इतर सामान्य आरोग्य, समस्यांसाठी समुपदेशन. या अभियानात राज्यातील सर्व सरकारी रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि आरोग्य उपकेंद्रे सहभागी होणार आहेत. विशेषतः50 वर्षावरील महिलांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे. या अभियानामुळे महिलांना त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याविषयी प्रोत्साहन मिळेल आणि गंभीर आजारांचे लवकर निदान होऊन योग्य वेळी उपचार सुरू करण्यास मदत होईल. यामुळे 'स्वस्थ नारी निरोगी परिवार' हे उद्दिष्ट साध्य होण्यास मदत होईल.

# केडीएमसीच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागामार्फत तलवारबाजी स्पर्धेचे आयोजन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने, महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या मागदर्शनाखाली तलवारबाजी स्पर्धा 2025-26 चे आयोजन दि.14 सप्टेंबर 2025 रोजी श्री वाणी विद्याशाला खडकपाडा कल्याण (प) येथे करण्यात आले होते. सदर स्पर्धेचे उद्घाटन महापालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. सदर तलवारबाजी स्पर्धेत 14,17, व 19 या वयोगटातील एकूण 100 ते 150 मुले व मुली यांनी सहभाग नोंदवला. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या वतीने तलवारबाजी ही स्पर्धा, इपी, फॉइल, व सेबर या तीन प्रकारात इलेक्ट्रॉनिक ऑपरेटर च्या माध्यमातून घेण्यात आल्या. सर्व विजेत्या स्पर्धकांना मेडल देऊन गौरविण्यात आले आहे. तसेच पंच, मदतनीस व खेळ प्रमुख यांचे मानधन देण्यात आले. सदर स्पर्धा इलेक्ट्रॉनिक ऑपरेटर चा वापर करून घेण्यात आल्यामुळे क्रीडाशिक्षक व स्पर्धकांनी समाधान व्यक्त केले.

सदर समयी क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे क्रीडा पर्यवेक्षक प्रविण कांबळे, खेळप्रमुख गजानन वाघ, चिफ रेफ्री मंदार कुलकर्णी, डॉ. विजय सिंग, चिंतामण पाटील, भूषण जाधव, गणेश मोरे ,संतोष पाटील, तसेच सहभागी शाळांचे क्रीडा शिक्षक तसेच शिक्षण व क्रीडा विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# जीवनदीप महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी प्लेसमेंट कार्यक्रम


दै.ठाणे जीवनदीप वार्ता

आजच्या आधुनिक जीवनात तसेच वाढती लोकसंख्या, नोकऱ्यांचा अभाव यामुळे महाविद्यालयीन मुले ही शैक्षणिक पात्रता पूर्ण करून देखील बऱ्याचदा योग्य नोकरी पासून वंचित राहतात. विद्यार्थ्यांना त्यांच्या कौशल्याप्रमाणे ,बुद्धिमत्तेप्रमाणे नोकरी मिळावी याकरिता जीवनदीप महाविद्यालय प्लेसमेंट सेल च्या मार्फत फ्लिपकार्ट, मॅजिक बस फाउंडेशन या ई - कॉमर्स कंपनी मार्फत शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून योग्य नोकरी देण्यासाठी प्राचारण करण्यात आलं होतं . दिनांक १६- ०९- २०२५ रोजी महाविद्यालयात प्रथम ,द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना या नामांकित कंपन्यांच्या मार्फत पी.पी.टी प्रेसेंटेशन द्वारे माहिति समजून सांगण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांना इंटरशिप व रोजगार मिळवून देण्याची हमी ई-कॉमर्स कंपनी फ्लिपकार्टच्या एच. आर खुशी सोम मॅडम यांनी दिली. तसेच मॅजिक बस फाउंडेशनच्या अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य जॉब मिळवून देण्याची हमी अनिता वटकर मॅडम यांनी दिली . जीवनदीप महाविद्यालयाचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे, प्राचार्य. डॉ.अशोक वाघ ,उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे यांचे या कार्यक्रमास मोलाचे सहकार्य लाभले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत प्रा. सचिन कांबळे यांनी केले. प्रा. मयुरी कांबळे, प्रा. अवंतिका मॅडम ,प्रा. प्रवीण भालेराव, प्रा.चिन्मय गुरव, प्रा. मोहन गारे ,प्रा. निलेश कुंभार व इतर प्राध्यापक ,शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी या सर्वांच्या सहकार्याने सदर कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला




विद्यार्थ्यांना त्यांच्या कौशल्याप्रमाणे ,बुद्धिमत्तेप्रमाणे नोकरी मिळावी याकरिता विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन

# मुंबई नाशिक महामार्गावरील वाहनांच्या उलट्या दिशेच्या प्रवासामुळे अपघाताची भिती



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील पडघा टोल वसुली कंपनीच्या अखत्यारित असलेल्या मुंबई नाशीक महामार्गावरील अनेक महत्त्वाच्या ठिकाणी वाहनचालकांचा उलट्या दिशेने सुरू असलेल्या प्रवासामुळे अपघाताची भिती व्यक्त करण्यात येत आहे.

पडघा परिसरात मुंबई नाशीक महामार्गालगत मोठ्या प्रमाणात नामांकित कंपनीच्या गोदामांची संख्या वाढत असुन त्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांची संख्या सुध्दा दिवसेंदिवस वाढत आहे. बहुतांश कामगार हे दुचाकी, चारचाकी वाहने घेऊन कामावर हजर होतात मात्र त्यांना येण्या - जाण्यासाठी मुंबई नाशीक महामार्गावर दुभाजक तोडून रस्ता ठेवला नसल्याने कुरुंद फाट्यावरील प्रख्यात लॉजेस्टीक पार्क मधील गोदामात जाण्यासाठी पडघा टोलनाक्यावरून, कोंशीबी येथील साईधाम लॉजेस्टीक पार्कमधील गोदामात जाण्यासाठी कोंशीबी फाट्यावरुन, कुकसे येथील सुमीत लॉजेस्टीक पार्कमधून बाहेर पडल्यानंतर पडघा, वांसीद, शहापुर कडे जाण्यासाठी, पडघ्याजवळील अँटो फ्लीट पेट्रोल पंपावर वाहनात पेट्रोल भरल्यानंतर, पडघा पाच्छापुर रस्त्यावरून पडघ्यात येण्यासाठी, वडपा खिडींतील लॉजेस्टीक पार्क मध्ये जाण्या - येण्यासाठी वाहनांचा उलट्या दिशेने धोकेदायक प्रवास सुरू असुन तो अनेक जणांच्या जिवावर बेतु शकतो तसेच उलट्या दिशेने येणाऱ्या वाहनांना जागा करून देताना मुबई नाशीक महामार्गावरील भरधाव वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे तसेच सकाळी कामाच्या व संध्याकाळी काळोख पडल्यावर गोदामामधुन सुट्टी झाल्यानंतर कामगाराच्या वाहनांचा उलट्या दिशेने प्रवास सुरू असल्याने अपघाताचा धोका आणखी वाढला आहे तसेच अनेक वेळा अपघातही घडत आहेत. त्यामुळे मुंबई नाशीक महामार्गालगत असलेल्या विविध गोदाम पार्क समोर महामार्गावरील राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी दुभाजक तोडून येण्या - जाण्यासाठी रस्ता व पडघ्याजवळील पेट्रोल पंप ते पडघा सेवा रस्ता तयार करावा अशी मागणी नागरिकांकडुन होत आहे. त्यामुळे अनेक कामगार, वाहनचालक यांचा उलट्या दिशेचा प्रवास बंद होऊन अपघाताचा धोका कमी होईल.

# CHM महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा विजय

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : स्वामी विवेकानंद युवक विकास संस्था (SVYVS) मुंबईचे अध्यक्ष अभिषेक राठोड व विषय सर्वप्रथम मांडणारे मनीष यादव यांच्या प्रयत्नातून मुंबई विद्यापीठ संलग्न, प्रतिष्ठित CHM कॉलेज मधील विद्यार्थ्यांचा मोठा प्रश्न सुटला.

विद्यार्थ्यांनी हजेरी लावूनही व असाइनमेंट सबमिट करूनही त्यांना अनुपस्थित (Absent) दाखविण्यात आले होते. हा गंभीर विषय हाताळत अभिषेक राठोड स्वतः विद्यार्थ्यांसोबत कॉलेजात गेले आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळेपर्यंत ठाम उभे राहिले.

कॉलेज प्रशासन व परीक्षा समितीशी जोरदार चर्चेनंतर, एकेक विद्यार्थ्याशी संपर्क करून तपासणी करण्यात आली आणि योग्य हजेरी परत देण्यात आली.

हा विद्यार्थ्यांचा मोठा विजय आहे. अभिषेक राठोड यांनी निर्भयपणे विद्यार्थ्यांचा मुद्दा पुढे मांडला व त्यांना न्याय मिळवून दिला.

ते म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या हक्कासाठीची ही लढाई पुढेही सुरू राहील आणि कुठलाही अन्याय झाल्यास ते नेहमीच विद्यार्थ्यांसोबत खंबीरपणे उभे राहतील




# वाडा ग्रामीण रुग्णालयाला गरजू वस्तूंची भेट




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : सामाजिक बांधीलकी जोपासत जय जय महाराष्ट्र ग्रुपकडून वाडा ग्रामीण रुग्णालयासाठी आवश्यक वस्तू देण्यात आल्या. यामध्ये 30 उशा, 06 पंखे, 04 झाडू, 08 खराटे, 03 वायफर, 02 पोछा, 100 चादर, 100 बेडशीट, 100 उशी कव्हर, 04 डोअर मॅट इत्यादी साहित्याचा समावेश होता.

रुग्णालयाची गरज ओळखून ही मदत दिल्याचे ग्रुपच्या माध्यमातून सांगण्यात आले.

दवाखान्यात तालुक्यातील अनेक माताभगिनी प्रसूती साठी जात असतात, अनेक गोर गरीब रुग्ण उपचारांसाठी जात असतात. थंडीचे दिवस येत चालले आहेत त्यामुळे चादरीचा तुटवडा जाणवतो. रुग्णांच्या आरोग्यासाठी स्वच्छ व आरामदायक वातावरण अनमोल असते. अनेकदा बेडशीट-चादरी, इतर साहित्य जीर्ण असते याचा आरोग्य व मानसिकतेवर परिणाम होऊ शकतो. हीच गरज ओळखून स्वच्छ, सुरक्षित आणि अधिक आरामदायक सेवा मिळण्यासाठी हा उपक्रम राबविल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

या ग्रुपच्या माध्यमातून नेहमीच छोटे मोठे उपक्रम राबविण्याचा प्रयत्न असतो. तालुक्यातील गोरगरीब जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने राबविलेल्या ह्या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# ओबीसी विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्जासाठी अर्ज करण्याचे आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : राज्यातील इतर मागासवर्गीय (OBC) समाजातील दुर्बल घटकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शासनाने या महामंडळाची स्थापना केली आहे. समाजातील इतर मागासवर्गीयांच्या आर्थिक उन्नतीसाठी महामंडळामार्फत स्वयंरोजगाराच्या विविध कर्ज योजना राबविण्यात येतात.

योजनेचा उद्देश- इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरीता बँकेमार्फत मंजूर केलेल्या रू. 20.00 लक्ष पर्यंत कर्ज रकमेवरील व्याज परतावा महामंडळाकडून वितरीत केला जाईल.

योजनेचे स्वरूप- राज्यांतर्गत व देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी महत्तम कर्ज मर्यादा रू. 10.00 लक्ष पर्यंत. परदेशी अभ्यासक्रमासाठी महत्तम कर्ज मर्यादा रू. 20.00 लक्ष पर्यंत. कार्यपद्धती-ही योजना पुर्णपणे ऑनलाईन असून ज्या उमेदवारांना शैक्षणिक कर्ज योजनेचा लाभ घ्यावयाचा असेल त्यांनी आपले अर्ज महामंडळाच्या www.msobcfdc.org या संकेतस्थळावर जावून भरावयाचे आहेत.

लाभार्थी पात्रतेच्या अटी व शर्ती- अर्जदाराचे वय 17 ते 30 वर्ष असावे. अर्जदार हा इतर मागास प्रवर्गातील असणे तसेच तो महाराष्ट्राचा रहीवासी असावा. अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामिण व शहरी भागाकरीता रू.8.00 लक्ष पर्यंत असावी. अर्जदार हा इयत्ता 12 वी 60% गुणांसह उत्तीर्ण असावा तसेच पदवीच्या व्दितीय वर्षे व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारे विद्यार्थी 60% गुणांसह पदवीका (Diploma) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अर्जदाराचा सिबील क्रेडीट स्कोअर किमान 500 पेक्षा अधिक असावा,

कर्ज प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे- अर्जदाराचा इतर मागास प्रवर्गातील जामीचा दाखला. तहसिलदार यांचा नॉलक्रिमिलेयर दाखला. तहसिलदार यांचा महाराष्ट्र रहिवासी (वय अधिवास) दाखला. अर्जदार व अर्जदाराचे पालक यांचे आधारकार्ड. ज्या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक कर्ज आवश्यक आहे त्या अभ्यासक्रमासाठीची पात्रता परिक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका. अर्जदार व अर्जदाराचे पालक यांचे पासपोर्ट फोटो. अर्जदाराचा जन्माचा/वयाचा पुरावा. शैक्षणिक शुल्क संबधित पत्र. शिष्यवृत्ती (Scholarship), शैक्षणिक शुल्कमाफी (Freeship), पात्रतेबाबतचे प्रमाणपत्र. मान्यताप्राप्त संस्थेत प्रवेश घेतल्याचा पुरावा. आधार संलग्न बँक खाते पुरावा. तसेच इतर आवश्यक कागदपत्रे / पुरावे.

## शैक्षणिक कर्ज योजनेतंर्गत येणारे अभ्यासक्रम

राज्यांतर्गत येणारे अभ्यासक्रम- आरोग्य विज्ञान - MBBS.BDS, BAMS, BHMS, B. Pharm, व संबधित विषयांतील सर्व पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रम. अभियांत्रिकी- B.E.B.Tech.,B.Arch (सर्व शाखा), तसेच संबधित विषयांतील सर्व पदवी व पदवीत्तर अभ्यासक्रम इ. व्यावसायिक अभ्यासक्रम LLB, हॉटेल मॅनेजमेंट, फॅशन टेक्नोलॉजी, इंटेरिअर डिझाईन पदवी, बचलर ऑफ डिझाईन, फिल्म व टेलीव्हिजन अभ्यासक्रम, पायलट, सनदी लेखापाल, MBA.MCA SHIPPING, विषयांतील पदवी व पदवीत्तर अभ्यासक्रम, इ. कृषी अन्नप्रकीया व पशुविज्ञान Animal & Fishery Sciences, B.Tech., BVSC, B.Sc. इ संबधित विषयांतील सर्व पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रम.

देशांतर्गत अभ्यासक्रम- केंद्रीय परिषद, कृषी विद्यापीठ परिषद, शासकीय अनुदानित व खाजगी मान्यताप्राप्त (NACC) अभ्यासक्रमासाठी प्रात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेले व प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता आहे. यात आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यावसायिक व व्यवस्थापन, कृषी अन्नप्रक्रिया व पशुविज्ञान या अभ्यासक्रमाचा समावेश आहे.

परदेशी अभ्यासक्रम-आरोग्य विज्ञान, विज्ञान, कला, अभियांत्रिकी, व्यावसायिक अभ्यासक्रम यामध्ये समाविष्ट अभ्यासक्रम.

व्याज परतावा व परतफेडीचा कालावधी- शिक्षण पूर्ण केलेल्या अर्जदाराने बँकेने मंजूर केलेल्या कर्जाची नियमीत परतफेड केलेल्या हप्त्यामधील नियमित असलेल्या व्या रकमेचा परतावा (कमाल 12 टक्के पर्यंत) महामंडळ अदा करेल. तसेच व्याज परतावासाठी जास्तीत जास्त 5 वर्षे कालावधी ग्राह्य धरण्यात येईल.


अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालयाच्या खालील पत्यावर अथवा महामंडळाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी.

कार्यालयाचा पत्ता- श्रीराम समर्थ गृहनिर्माण सह सो., पहिला मजला, रुम नं १०१, मारुती मंदिराच्या मागे, चेंढरे, अलिबाग, रायगड दुरध्वनी क्रमांक-02141-224448, ईमेल- dmobcalibagraigad@gmail.com, वेबसाईट- www.msobcfdc.org.

# आठ नगरसेवकांनी हाती घेतलेले शिवधनुष्य तारणार का ?

## मुरबाडकरांमध्ये जोरदार चर्चा





विद्यमान नगराध्यक्ष संतोष चौधरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड(दिलीप पवार) : मुरबाड नगरपंचायत मध्ये गेल्या काही दिवसात नाट्यमय राजकीय घडामोडी घडून आल्या. कोणाच्याही ध्यानी मनी नसताना भाजपाच्या 9 नगरसेवकांनी उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणूकीत आमदार कथोरेंच्या विरोधात जाऊन मतदान केले व उघडपणे बंड केले. त्यानंतर जिल्हाधिकारी यांची मंजुरी घेऊन मुरबाड परिवर्तन पॅनलची स्थापना केली. त्याचवेळी हे नगरसेवक माजी खासदार कपिल पाटील, वनमंत्री गणेश नाईक, खासदार बाळ्या मामा म्हात्रे, शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या भेटीगाठी घेऊन पक्ष प्रवेशासाठी धडपडत होते . सरते शेवटी काल परवा पडघा येथे जाऊन शिवसेना उपनेते प्रकाश पाटील यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे पक्षात जाहीर प्रवेश करून शिवधनुष्य हाती घेतले. विकास निधीत आमदार कथोरेंकडून आमच्यावर अन्याय झाला असा मुख्य आरोप करत आम्ही हे बंड केले असे हे या कटाचे मुख्य सुत्रधार माजी नगराध्यक्ष राम दुधाळे व अन्य नगरसेवक सांगत आहेत. परंतु ही कारणे सांगून पक्षांतर केल्याने मुरबाड नगरपंचायतच्या राजकारणात फारसा फरक पडला आहे असे सध्या तरी दिसत नाही. फुटिर गटातील विद्यमान नगराध्यक्ष संतोष चौधरी मात्र तटस्थ राहीले असल्याने त्यांनी या पक्ष प्रवेशा पासून दुर राहणे पसंत केले आणी फुटीर परिवर्तन गटाची गोची झाली असल्याची चर्चा सध्या मुरबाड मध्ये होत आहे.

विद्यमान नगराध्यक्ष संतोष चौधरी यांनी शिंदे गटात प्रवेश न घेता ते सध्यातरी वेंट अँन्ड वॉच भुमिकेत आहेत. परंतु आज जे 8 नगरसेवक आमदार किसन कथोरेंची साथ सोडून गेले आहेत, त्यातले कीती जण 2027 ला पुन्हा नगरसेवक म्हणून निवडून येतील हा येणारा काळच ठरविणार आहे. दुसरं म्हणजे उर्वरित 14 महिन्यात हे नगरसेवक असा कीती करोड निधी आणून आपल्या वार्डातील नागरिकांना उत्तम सेवा देऊन व विकासाची नविन गंगा आणून सुजलाम -सुफलाम करणार आहेत हे मुरबाडकरांना लवकरच पाहायला मिळणार आहे.

नगराध्यक्ष संतोष चौधरी यांनी राजकीय शहाणपण दाखवित आपले नगराध्यक्ष पद सध्यातरी शाबुत ठेवले आहे. परंतु मागिल निवडणूकीत काठावर पास झालेल्या नगरसेवकांचा येणार्या पुढील निवडणूकीत आमदार कथोरे कार्यक्रम करणार का ? यांनी हाती घेतलेले शिवधनुष्य यांना तारणार अशी जोरदार चर्चा मात्र सध्या मुरबाड मध्ये रंगू लागली आहे.

* दरम्यान या संदर्भात विद्यमान नगराध्यक्ष संतोष चौधरी यांची प्रतिक्रिया विचारली असता जे नितीमत्तेला धरून असेल व मुरबाड शहरातील नागरिकांच्या हिताचे असेल तो निर्णय मी घेणार असल्याचे त्यांनी आपले सावध मत या राजकीय घडामोडीवर व्यक्त केले असल्याने सध्यातरी त्यांची तटस्थ भुमिका असल्याचे दिसत आहे. *

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई ■ नवी मुंबई ■ ठाणे ■ पालघर ■ रायगड
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# शहर विद्रुपीकरणात भर घालणाऱ्या अतिक्रमणांवर केडीएमसीची कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार 6/फ प्रभागाच्या सहा.आयुक्त हेमा मुंबरकर यांनी डोंबिवली पूर्वेतील शेलार नाका व जोशी हायस्कुल परिसरातील विद्रुपीकरण करणाऱ्या 3 शेड्स, 95 लहान/मोठे बॅनर्स, 3 कमानींवर निष्कासनाची कारवाई केली.




तसेच शेलार नाका येथील खाद्यपदार्थांच्या गाड्या हटवून, फुटपाथ वरील अतिक्रमण काढण्यात येवून पदपथ नागरीकांना चालण्यासाठी मोकळे करण्यात आले.

सदर कारवाई अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागातील कर्मचारी व फेरीवाला हटाव पथकातील कर्मचारी यांच्या सहाय्याने करण्यात आली.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी अ‍ॅण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

*Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,*
*Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*
*Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024*